जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक बीड **लोकनेता**

रविवार दि.२३ मार्च २०२५

हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
-ॲड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत — संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक :१८८ किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in

# जयंत पाटील तिथे अस्वस्थ, त्यांना करमत नाही: ते भविष्यात पक्ष सोडतील हे निश्चित

## शिंदे गटाचे नेते संजय शिरसाट यांचा मोठा दावा

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

मांजरी येथील वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटच्या नियामक मंडळाची आज बैठक पार पडली. या बैठकीआधी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आणि अजित पवार यांच्यात बंद दाराआड चर्चा झाली. या चर्चेनंतर अनेक तर्कवितर्क लावले जात आहेत. जयंत पाटील आणि अजित पवारांच्या बंद दाराआडच्या चर्चेवरून राज्याचे सामाजिक न्याय मंत्री आणि शिंदे गटाचे आमदार संजय शिरसाट यांनी मोठा दावा केला आहे. भविष्यात जयंत पाटील पक्ष सोडतील हे निश्चित आहे, असे संजय शिरसाट म्हणाले.जयंत पाटील आणि अजित पवार या दोघांच्या बंद दाराआड बैठकीत नेमकी काय चर्चा झाली? याचा तपशील समजला नाही. पण जयंत पाटील यांच्या गत काही महिन्यांपासून सुरू असणाऱ्या पक्षांतराच्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर ही भेट अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. त्यातच आता संजय शिरसाट यांनी जयंत पाटील पक्ष सोडतील असा दावा केल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.मी अनेक वेळा सांगितले जयंत पाटील तिथे अस्वस्थ आहेत, त्यांना करमत नाही, असे संजय शिरसाट म्हणाले. यापूर्वीच ते अजित दादा यांच्याबरोबर येणार होते. पण, काय झाले माहीत नाही. अजित पवार आणि जयंत पाटील यांच्यात बंद दाराआड राजकीय चर्चा देखील होऊ शकते. मला त्याबाबत कल्पना नाही. मात्र, भविष्यात जयंत पाटील पक्ष सोडतील हे निश्चित आहे, असा दावा संजय शिरसाट यांनी केला.



संजय शिरसाट यांनी यावेळी बोलताना संजय राऊत यांच्यावरही जोरदार निशाणा साधला. ज्यांनी गद्दारी केली ते असे बोलतात का? शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचाराशी गद्दारी करून काँग्रेस, राष्ट्रवादीच्या मांडीवर बसणारे निष्ठेच्या गोष्टी शिकवतात. यामुळेच यांनी सगळा पक्ष संपवला. संजय राऊत जे बोलतात त्याच्या नेमके उलट घडते हा आतापर्यंतचा इतिहास आहे. म्हणून यापुढे उबाठा आणि राष्ट्रवादीत स्फोट होईल, असा घणाघात संजय शिरसाट यांनी केला.नागपूरमध्ये जी दंगल झाली आहे त्यामागे कोण आहे? ज्यांना मुख्यमंत्री हे गृहमंत्री म्हणून अपयशी आहेत असे दाखवायचे आहे का? याचा विचार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी करायला पाहिजे, असे आदित्य ठाकरे म्हणाले होते. याबाबत संजय शिरसाट यांना विचारले असता, फडणवीसांना खाली दाखवण्यासाठी दंगल केली असेल, तर यात हात कोणाचा आहे हे देखील सांगायला हवे होते, असा टोला आदित्य ठाकरे यांना लगावला. महाविकास आघाडीने जाणूनबुजून घडवून आणलेली ही दंगल आहे, असा आरोप करत आमचे सरकार यातील एकही आरोपी सोडणार नाही, असे संजय शिरसाट म्हणाले.

# ग्रामीण रुग्णालय कसार सिरसी येथे संशयित क्षय रुग्णाची तपासणी



लोकनेता न्यूज नेटवर्क

**कासार सिरसी । फिरोज जागीरदार**

कासार सिरसी येथे केंद्र शासनाने देश क्षयरोगमुक्त भारत करण्याचा संकल्प केला असून त्या दृष्टीने मिशन १०० दिवस सात कलमी कार्यक्रमांतर्गत उपक्रम कासार शिरशी ग्रामीण रुग्णालय अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र कासार बालकुंदा रामलिंग मुदगड व परिसरातील प्राथमिक आरोग्य केंद्र येथील रुग्णांची क्ष-किरण तपासणी येथील वैद्यकीय अधीक्षक पाटील मॅडम यांच्या मार्गदर्शनात करण्यात आली यावेळी डॉक्टर आर बी मोरे डॉक्टर बी एस सावंत पी व्ही करपे एम एम शेळके ए ए मसने आदी ची उस्थिती होती.

### पुण्यश्लोक महानाट्याचा प्रयोग २३ मार्च रोजी पुणे येथे होणार संपन्न

# अहिल्यादेवी होळकर आणि मल्हारराव होळकर जयंती निमित्त महानाट्याचे आयोजन!

लोकनेता न्यूज नेटवर्क

**पुणे । बबनराव धायतोंड**

सांस्कृतिक कार्य संचानालय मार्फत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ३०० वी जयंती वर्ष आणि श्रीमंत सुभेदार मल्हारराव होळकर यांच्या जयंती निमित्त महानाट्याचा प्रयोग २३ मार्च रोजी पुण्यात संपन्न होणार आहे.बहुचर्चित अशा पुण्यश्लोक महानाट्याचा प्रयोग रविवार (दि. २३) रोजी दुपारी १२ वाजता भरत नाट्यमंदिर सदाशिव पेठ पुणे येथे होणार आहे. श्रीमंत सुभेदार मल्हारराव होळकर जयंती आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती वर्ष निमित्ताने या प्रयोगाचे आयोजन सांस्कृतिक कार्य संचालनालय,महाराष्ट्र शासन यांच्या वतीने करण्यात आले आहे. सदर कार्यक्रमाला विधान परिषदेचे सभापती नामदार प्रा.राम शिंदे, सांस्कृतिक व माहिती तंत्रज्ञान मंत्री मा.ना.ड.आशिष शेलार,उच्च व तांत्रिक शिक्षण मंत्री चंद्रकात पाटील,क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे, होळकर घराण्याचे वंशज महाराज यशवंतराव होळकर (तृतीय),आमदर राहुल कुल यांच्यासह अनेक दिग्गज मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या महानाट्याची संकल्पना सांस्कृतिक व माहिती तंत्रज्ञान मंत्री मा.ना.ड.आशिष शेलार यांची असून मा.विकास खारगे, (भा.प्र.से.) मा.मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव आणि सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव,यांचे मार्गदर्शन लाभले आहे. मोठ्या संख्येने कार्यक्रमासाठी उपस्थित राहावे असे आवाहन बिभीषण चवरे संचालक सांस्कृतिक कार्य संचालनालय मुंबई,यांनी केले आहे.




# पुरोगामी पत्रकार संघाच्या बिलोली तालुकाध्यक्षपदी धम्मपाल जाधव तर कार्याध्यक्षपदी संजय जाधव

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली । गौतम गावंडे**



बिलोली येथे शासकीय विश्राम ग्राहात दिनांक २१/०३/२०२५ रोजी येथे बैठक घेण्यात आली या बैठकीस राज्य कार्याध्यक्ष शंकर सिंह ठाकुर मराठवाडा अध्यक्ष मारुती शिकारे. मराठवाडा महासचिव चंद्रकांत गव्हाणे तसेच नांदेड जिल्हा उपाध्यक्ष सुशील कुमार बिल्लाळीकर यांच्या उपस्थितीत निवड पार पडली त्यात बिलोली तालुका अध्यक्ष म्हणून धम्मपाल एकनाथ जाधव कार्याध्यक्ष संजय नागोराव जाधव तालुका उपाध्यक्ष मारुती चांदु भुसावले, धम्मदीप बाबाराव गावंडे, गौतम पिराजी गावंडे, तालुका सचिव भास्कर मरिबा भेदेकर, तालुका सहसचिव दीपक केसराळीकर, तालुका कोषाध्यक्ष भास्कर गंगाधर कुडके, संघटक म्हणून आनंद विठ्ठलराव कुरुडवाडे, सह संघटक नागनाथ विठ्ठल भंडारे, तसेच बिलोली शहराध्यक्षपदी विरनंद संग्राम हायगले यांची निवड करण्यात आली यावेळी राज्य कार्याध्यक्ष शंकर सिह ठाकूर यांनी मार्गदर्शन केले त्यानंतर मराठवाडा अध्यक्ष मारुती शिकारे मराठवाडा महासचिव चंद्रकांत गव्हाणे नांदेड जिल्हा उपाध्यक्ष सुशीलकुमार बिल्लाळीकर यांनी मार्गदर्शन केले.

# ब्रेन डेव्हलपमेंट स्कॉलरशिप परीक्षेत कु.अनुश्री तेलंग हीने पटकावला महाराष्ट्रातून १३ वा क्रमांक

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव पाटील**



पेठवडज येथे नांदेड, पुणे, मुंबई सारख्या शहरातील इंग्लिश स्कूल च्या शिक्षणाप्रमाणे शिक्षण दिले जाते ते शिक्षण परफेक्ट इंग्लिश स्कूल पेठवडज मध्ये मिळते.याचे सर्व श्रेय परफेक्ट इंग्लिश स्कूल पेठवडज चे संस्थापक सचिव श्री.गोविंदराव केंद्रे साहेब यांना जाते.ब्रेन डेव्हलपमेंट स्कॉलरशिप परीक्षा २०२५ मध्ये परफेक्ट इंग्लिश स्कूल पेठवडज ची विद्यार्थीनी अनुश्री अशोक तेलंग हिने महाराष्ट्र राज्यात १३ वा क्रमांक मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. तिच्या या उज्ज्वल कामगिरीमुळे संपूर्ण परफेक्ट इंग्लिश स्कूलमध्ये व कुटुंबांमध्ये आणि शिक्षकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.ब्रेन डेव्हलपमेंट स्कॉलरशिप परीक्षा ही विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकास आणि तर्कशक्ती तपासणारी अत्यंत प्रतिष्ठित परीक्षा आहे.

महाराष्ट्र राज्यभरातून हजारो विद्यार्थी या परीक्षेत सहभागी झाले होते, मात्र कु.अनुश्री अशोक तेलंग हिने कठोर परिश्रम आणि सातत्याने अभ्यास करून उच्च स्थान प्राप्त केले.तिच्या या यशानंतर आपल्या भावना व्यक्त करताना कु.अनुश्रीने आमच्या दैनिक लोकनेता प्रतिनिधींना सांगितले की,या यशाचा मला खूप आनंद आहे. माझ्या शाळेने,शिक्षकांनी आणि कुटुंबाने नेहमीच मला प्रोत्साहन दिले. माझ्या मेहनतीचे फळ मिळाल्याने खूप समाधान वाटते. भविष्यातही मी अधिक प्रयत्न करून आणखी यश मिळवण्याचा प्रयत्न करेन.परफेक्ट इंग्लिश स्कूल पेठवडज चे संस्थापक सचिव आदरणीय गोविंदराव केंद्रे साहेब यांनी सांगितले की,ही आमच्या शाळेसाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे. कु.अनुश्री तेलंग हिने अतिशय मेहनतीने अभ्यास करून हे यश संपादन केले आहे. तिच्या पुढील वाटचालीसाठी आम्ही तिला मनःपूर्वक शुभेच्छा देतो.तिच्या या उत्तुंग यशाबद्दल शाळेच्या वतीने तिचा सत्कार करण्यात आला.संस्थापक सचिव ,शिक्षक, कुटुंबीय आणि मित्रपरिवाराने तिचे अभिनंदन केले. तिच्या पुढील शैक्षणिक प्रवासासाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या नांदेड युवक जिल्हाध्यक्षपदी अंगद पाटील मडकीकर यांची निवड

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । गोविंद पा.मोरे**



पुणे येथे राज्यव्यापी बैठकीमध्ये सर्वानुमते क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष रविकांत भाऊ तुपकर यांनी शेतकरी चळवळीत काम करत असताना अंगद पाटील मडकीकर यांची नांदेड युवा आघाडीच्या जिल्हाध्यक्षपदी निवड केली असता अंगद पाटील म्हणाले की मला जी जबाबदारी दिली आहे पूर्णपणे पार पाडेल संपूर्ण जिल्हाभर फिरून शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी लढा लढेल पिक विमा, शेतकऱ्यांची कर्जमाफी असेल,अनुदान जिथे शेतकऱ्यांची फसवणूक होत असेल अडचणी सोडवेल असे बोलताना अंगद पाटील मडकीकर म्हणाले उपस्थित क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष रविकांत भाऊ तुपकर,प्रदेश अध्यक्ष कसबे सर, महाराष्ट्र युवा प्रदेशाध्यक्ष लक्ष्मण मोरे, जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पाटील जाधव व पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# उद्धव ठाकरेंनी संबंध ठेवले नाहीत

## देवेंद्र फडणवीस यांची सडेतोड उत्तरे

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

उद्धव ठाकरे यांच्याशी आता पुन्हा युती होऊ शकत नसल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. इतकेच नाही तर उद्धव ठाकरे यांनी काहीही संबंध ठेवले नाही, त्यांनी संबंध तोडून टाकले आहेत. म्हणजे आमच्यात मारामारी झाली नाही, समोर आलो तर आम्ही चांगले बोलतो, नमस्कार करतो. पण आता उद्धव ठाकरे यांच्यासोबत संबंध नसल्याचे मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे. एका वृत्त वाहिनीच्या कार्यक्रमात आयोजित करण्यात आलेल्या विशेष मुलाखती दरम्यान त्यांनी अनेक प्रश्नांची सडेतोड उत्तर दिली.

लाडके ठाकरे कोण? उद्धव ठाकरे की राज ठाकरे? असा प्रश्न देवेंद्र फडणवीस यांना विचारण्यात आला होता. यावर उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी थेट उत्तर देणे टाळले आहे. ठाकरे असे आहेत की, त्यांना आपण लाडके म्हणायचे आणि त्यांनी आपल्याला दोडके म्हणायचे. त्यामुळे यामध्ये आपण कशासाठी पडायचे? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. गेल्या पाच वर्षांमध्ये माझा उद्धव ठाकरेंसोबत काही संबंध राहिलेला नाही. राज ठाकरेंसोबत मात्र संबंध राहिले आहेत. उद्धव ठाकरे यांनी संबंध तोडून टाकले. म्हणजे मारामारी नाही, मात्र समोर आलो तर आम्ही चांगले बोलतो, नमस्कार करतो. पण उद्धव ठाकरे सोबत कोणताही संबंध नसल्याचे फडणवीस यांनी म्हटले आहे.




# स्व.गोपालसिह ठाकूर यांचे नेत्रदान समाजाला दिशा देणारे ठरणार-अटकोरे

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । गौतम बनसोडे**

स्व.गोपालसिह ठाकूर यांचे वयाच्या ९५ व्या वर्षी १७ मार्च च्या सायंकाळी साडेसहा वाजता निधन झाल्यानंतर त्यान्चे सुपुत्र दिलीप सिंह ठाकूर यानी वडीलांचे नेत्रदान करायचे असल्याचे मला फोनवरून सागितले .मी लगेच शासकीय रुग्णालयाच्या डॉक्टराना फोन केले .दरम्यान दिलीप सिंह ठाकूर यानीसुध्दा संबधित डॉक्टराना माहिती दिली त्यामुळेच मृत्यु नतर सहा तासात नेत्रदानासाठीची प्रक्रिया यशस्वीपणे पार पडली .शासकीय रुग्णालयात नेत्रदान समुपदेशक म्हणुन सेवेत असलेल्या ज्योती पिम्पळे या महिलेची भुमिका महत्वाची ठरली .शासकीय रुग्णालयातील नेत्रतज्ञ डॉक्टर चव्हाण, डॉक्टर रावुत, डॉक्टर सोहेलखान, डॉक्टर सिध्देश,डॉक्टर प्रभावती निलपत्रेवार यांच्या टीमने यशस्वी कामगिरी केल्यामुळे आता गरजूला द्रुष्टी मिळणार आहे . स्व.गोपालसिह ठाकूर हे एस.टी. कर्मचारी संघटनेत अध्यक्ष असताना त्यानी कर्मचाऱ्यांचे अनेक प्रश्न सोडविण्यासाठी मोठे योगदान दिले होते .आठ वर्षांपूर्वीच मी त्यान्चे घरी जाऊन चर्चा केली होती .एका तासाच्या चर्चेत त्याच्या बोलण्यात सामाजिक जाण दिसून आली ..वडीलांच्या सामाजिक जाणिवेचा वारसा दिलीपसिंह ठाकूर यानी प्रत्यक्ष आमलात आणून त्यान्चे





नेत्रदान करण्याचा धाडशी निर्णय घेतला हे समाजाला दिशा देणारे,जाणीव करून देणारे ठरणार आहे म्हणून दिलीपसिंह ठाकूर यांचे मनापासून स्वागत करायलाच हवे . अवयवदानाच्पा प्रक्रियेत समुपदेशकाची भुमिका महत्वाची असते .कुटुंबातील प्रिय व्यक्तीच्या निधनानंतर शोक सागरात बुडालेल्या आप्तेष्टांना निर्धार अधिक महत्वपूर्ण ठरतो .नेत्रदानाचा निर्णय दिलीप ठाकूर यानी घेऊन गरजू रूग्णावर फार मोठे उपकार केले आहेत. अशी दुर्मिळ उदाहरण दिसतात. आपला समाज श्रध्दा जपणारा,परम्परा मानणारा आणि दान करणाराही आहे .धनिक लोक पैशाच्या बळावर वस्त्र दान,अन्नदान करतात परंतु जगात अवयवदान हेच असे सर्वश्रेष्ठ दान आहे तो भिकारीसुध्दा करू शकतो म्हणून अवयवदान या पवित्र पुण्य कर्माला महत्व आहे .म्रुत्युनतर सहा तासाच्या आत अवयवदान करणे आवश्यक असते .कोणतेही अवयवदान करण्यासाठी सकारात्मक मानसिकतेची गरज असते .आपल्या रूढीप्रिय समाजाची मानसिकता बदलण्याच्या अवघड कामात आम्ही मागील आठ वर्षांपासून धडपडत आहोत .२०१६ पासून आजपर्यंत १० वर्षात हळूहळू का होईना बदल घडत आहेत हे या चळवळीचे यश आहे.आयुष्यभर जे अवयव आपणाला सुखदुःखात साथ देतात त्यान्च्या अस्तित्वामुळे आपण जीवनात आनन्द उपभोगतो मात्र म्रुत्युनतर हेच अवयव आपण जाळून त्याचा अपमान करतो हे योग्य नाही .शासनस्तरावर अवयवदान चळवळ गतीमान करण्याचे सतत प्रयत्न सुरू आहेत परतु अवयवदान विषयीचे गैरसमज आणि अज्ञान जो पर्यंत दुर होणार नाहीत तो पर्यंत या माणुसकीच्या विचाराला गतीमान येणार नाही .गोपालसिह ठाकूर यांच्या नेत्रदानाने दिलीपसिंह ठाकूर यानी जे समाजाभिमुख कार्य केले त्याबद्दल समाज त्यांचा ऋणी राहील .दिलीपसिंह ठाकूर सारखे सुपुत्र घरोघरी जन्माला यावेत हीच अपेक्षा आहे .अवयवदान, देहदान वचनपत्र भरून घेणे ही मानसिकता बदलाची पहिली पायरी आहे .जीमतपणी जे लोक वचनपत्र भरून देतात त्यान्च्या निधनानंतर त्यान्चे आप्तेष्ट विरोध करून त्यांच्या इच्छेचा अवमान करतात. १२ फेब्रुवारी २०२५ रोजी नांदेडचे रहिवाशी बाळकृष्ण महाराज खडकेकर यांचे पुण्यात निधन झाल्यानंतर त्यांच्या पुत्राने देहदान करण्यास विरोध केला .खडकेकर महाराजानी आपण मरणोत्तर देहदान करण्याचे मला सागितले आणि वचनपत्र भरून दिले होते परतु दुर्दैवाने त्यांची इच्छा अपुर्ण राहीली .तात्पर्य म्रुत्युनतर आपल्याच शरीरातील सोन्यासारखे अवयव जाळून नष्ट न करता ते उदार मनाने दान करा हाच संदेश दिलीपसिंह ठाकूर यानी समाजाला दिला आहे आपण त्यांचे स्वागत करून आपणही तसाच निर्णय घेवून या.

# सर्व शेतकऱ्यांकरीता जाहीर सुचना

लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा । संतोष पा.जाधव**




सर्व शेतकऱ्यांना शासनाच्या वतीने सुचित करण्यात येत आहे की, ७/१२ वर जेवढे नांव आहेत त्या सर्व शेतक-यांनी गावातील तसेच नजीकच्या सीएससी केंद्रावर संपर्क करून फार्मर आय.डी. तयार करून घ्यावी.

शेतकरी ओळखपत्र तयार करण्यासाठी लागणारे कागदपत्रे पुढील प्रमाणे आहेत.

आधारकार्ड, सर्व ७/१२ किंवा नमुना ८ अ, आधारकार्ड सलग्न असलेला मोबाईल (ओटिपी येण्या करिता) फार्मर आय.डी. का बनवावी :- ज्याप्रमाणे सर्व सामान्य व्यक्तिची ओळख म्हणजे आधारकार्ड आहे.

त्याचप्रमाणे शेतकरी असल्याची ओळख म्हणजे फार्मर आय.डी. राहणार आहे. त्यामुळे ७/१२ शी संबधीत सर्व लाभाकरिता फार्मर आय.डी. अत्यावश्यक होणार आहे. फार्मर आय.डी. न बनविल्यास होणारे शेतकऱ्यांचे नुकसान पुढीलप्रमाणे आहेत.

१) पिएम किसान अंतर्गत लाभ बंद होईल.२) नमो शेतकरी अंतर्गत लाभ मिळनार नाही.३) पिक विमा निघनार नाही.४) पिक कर्ज मिळनार नाही.

५) धान खरेदि तथा बोनस थांबुन जाईल.

६) कृषिविषयक सर्व योजना करिता आवश्यक,७) नैसर्गिक आपत्ती पिक नुकसान मिळणार नाही.८) जमीन खरेदि विक्री करता येणार नाही.९) कर्ज माफी लाभ घेता येणार नाही. इत्यादी अशाप्रकारे अनेक लाभाकरिता फार्मर आय.डी. मागविला जाईल तेव्हा शेतकऱ्यांचे कोणतेही नुकसान होवु नये म्हणुन आजच फार्मर आय.डी. बनवुन घ्यावी असे आवाहन शासनाच्या वतीने शेतकऱ्यांना करण्यात आले आहे.

# वंचित बहुजन आघाडीचे २४ मार्च रोजी पंचायत समितीवर ढोल बजाओ आंदोलन

लोकनेता न्यूज नेटवर्क

**कळमदूरी । योगेश जाधव**



कळमनुरी तालुक्यातील कान्हेगाव,बऊर व डोंगरकडा ग्रामपंचायतच्या केलेल्या गैरकारभाराबाबत अनेक वेळा गट विकास अधिकारी पंचायत समिती कळमनूरी यांना लेखी तक्रारी देऊन देखील कारवाई केल्या जात नाही.याबाबत वंचित बहुजन आघाडी वतीने पंचायत समिती , कळमनुरी कार्यालयासमो ढोल बजावो आंदोलन करण्यात येणार आहे.

कान्हेगाव ग्रामपंचायत मध्ये गेली २०१० ते २०२५ पर्यंत दलित वस्ती विकास योजनेच्या माध्यमातून लाखो रुपयाचा निधी उचलला परंतु सदरील केलेले कामे समाज मंदिर, रोड, नाल्या, लाईट याबाबत लाखोंची उचलण्यात करण्यात आली असून भ्रष्टाचार झाला याप्रसंगी कोणतीही ठोस कारवाई केली जाते व ग्रामसेवक यांना निलंबित करून ग्रामसेवक व सरपंच यांच्यावर गुन्हा दाखल करावा व निलंबनाची कारवाई व्हावी. तसेच बऊर गावातील दलित वस्ती मधील रस्ता दलित वस्तीत न करता इतर ठिकाणी करण्यात आला व तिथली लाईट देखील नाही तसेच गेले किती वर्षांपासून ग्रामसभा घेतल्या जात नाहीत व ग्रामसेवक व सरपंच मनमानी कारभार करत असतात याबाबत पुरावे सादर करून देखील कारवाई केल्या जात नाही. तसेच डोंगरकडा प्रकरणात नागरिक सुविधांमध्ये ४४ लाखाचा रस्ता करता येत नसताना व त्याच ठिकाणी रोडावर रोड केला जात आहे हे चौकशी अहवाला सिद्ध झालं असून देखील येथील ग्रामसेवक व सरपंच वर कारवाई केल्या जात नाही अशा अनेक मागणी घेऊन सतत तक्रार देऊन देखील कोणतीही कारवाई केली जात नाही.या कारणास्तव या तिन्ही ग्रामपंचायतीच्या विरोधात वंचित बहुजन आघाडी २४ मार्च २०२५ रोजी शेकडो कार्यकर्ते ढोल बजावो आंदोलन करनार आहेत.वंचितचे , धम्मपाल पाईकराव, दादाराव खंदारे,बापूराव महाजन व इतर कार्यकर्ते मोठ्या संख्येने आंदोलन करणार आहेत.

# भारत महासत्तासाठी योग्यच

लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**

महासत्ता होण्यासाठी भारत योग्यच शेतकरी नेते मारोती गिते महत्त्वाचा विषय काल परवा अंतराळ यात्रा मोहीम यशस्वी झाली असून या मोहिमेची हाय कमांड भारतीय वंशाची सुपु त्री सुनिता विल्यम्स यांनी अत्यंत कठीण परिश्रमात मोहीम यशस्वी केली त्याबद्दल त्यांचे सर्व जगामधून त्यांच्यावर कौतुकांचा वर्षाव होत आहे त्यांनी खूप मेहनत घेऊन ही मोहीम यशस्वी केली व अनेक संशोधन अंतराळामध्ये त्यांनी केले अवघ्या आठ दिवसासाठी म्हणून यान हे मोहिमेला निघाले मात्र काही कारणास्तव तांत्रिक अडचणीमुळे त्यांचे टेशन संपर्क तुटला व यानाचा मार्ग बदलला गेला काळ फार कठीण होता कारण अंतराळामध्ये जाऊन रस्ता बदलला गेल्यामुळे खूप मोठे भीतीचे वातावरण होते आणि एक नाही दोन नाही तब्बल नऊ महिने बदललेल्या मार्गावर मार्गक्रमण करत राहिल्या आणि कोणत्याही डिप्रेशनमध्ये न येता वेगवेगळे संशोधन करत राहिल्या आणि सर्व सहकाऱ्यांना धीर देऊन अभ्यासपूर्वक संशोधन केले आणि संपूर्ण जगासमोर धैर्याची परिभाषा मांडल्या गेली आणि हे धैर्य हे साहस भारत मातेच्या पोटीच येऊ शकते हे सिद्ध झाले या मोहिमेला यशस्वी करण्यासाठी आणि अंतराळवीरांना धैर्य क्षमता वाढविण्यासाठी प्रेरणा स्तोत्र हे सोबत नेलेल्या भगवत गीतेच्या आधारावरच असू शकते असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही कारण जीवनातील संपूर्ण समस्यावर मात करण्यासाठी भगवद्गीता हा ग्रंथ खूप प्रेरणादायी आहे याआधी सुद्धा आपल्या देशाचे आपण ज्याला मिसाईल मॅन म्हणून संबोधतो असे महान युगपुरुष डॉ एपीजे अब्दुल कलाम सर यांनी सुद्धा भगवद्गीतेचा आधार घेतला असे त्यांचे वक्तव्य आहे यामधून आपल्याला भगवद्गीता सर्वात मोठे प्रेरणा स्तोत्र आहे हे सर्वोच्च संशोधन करते व सर्वोच्च आदर्शमय व्यक्ती यांनी बार बार त्यांच्या धैर्याची शक्ती कुठून येते त्यावेळेस यांनी जवळपास सर्वांनी च भगवद्गीते कडे बोट केले कारण भगवद्गीते मध्ये संपूर्ण ब्रम्हांडा बद्दल विचार मांडलेले दिसतात ज्या ज्या वेळेस जगाला काहीतरी वेगळे करायचे असते तेव्हा त्या मोहिमेमध्ये भारताचे योगदान असते आज भगवद्गीतेला जवळपास ५ हजार ५०० शे ६० ६२ वर्ष पूर्ण झाले असून ते विचार सर्वोच्च विचारांमध्ये आहेत कारण यामध्ये संपूर्ण विश्वासाठी भाष्य आहे धैर्याची परिभाषा स्थितप्रज्ञ मनुष्य कसा असतो याबद्दल भगवत मध्ये स्पष्ट आहे आणि ते स्पष्ट विचार धैर्याची परिभाषा ही काल परवा अंतराळ मोहीम यात्रा संपन्न झाली व सर्व यात्रेकरी सुखरूप आपल्या धरतीवर येऊन पोहोचले तेव्हा संपूर्ण जगाला भगवद्गीतेच्या विचारांचा आधार दिसला आणि आपल्या भारत मातेच्या अंतराळवीर सन्माननीय सुपु त्री सुनिता विल्यम्स यांनी सांगितले सुद्धा की आम्ही सोबत जाताना श्री गणेशा ची मूर्ती भगवद्गीता सोबत ठेवली होती यावरून हे स्पष्ट होते की हे भगवद्गीतेचे विचार भारत मातेच्या



कणाकणामध्ये रुजलेले आहेत आणि ते विचार खूप महान आहे आणि या विचाराच्या आधारावर आपला भारत देश विश्वगुरूच आहे कारण आतापर्यंत भारत देशाचा इतिहास बघितला असेल त्यामध्ये कधीच कुण्या परकीय देशावर जाणून बुजून आक्रमण केले नाही जेव्हा जगावर संकटे येतात त्या संकटाला तोड देण्यासाठी भारत देश हा सर्वात पुढे असतो आणि याआधी सुद्धा भगवद्गीते बद्दल स्वामी विवेकानंद यांनी अमेरिकेमध्ये विश्व हिंदू परिषद शिकागो येथे या भारतातल्या महान ग्रंथाबद्दल विचार मांडले व हे विचार सर्वमान्य झाले या भगवद्गीतेचे विचार आतापर्यंत झालेल्या कित्येक शूर वीर युगपुरुष यांनी गीतेचा आधार घेऊन आपापले जीवन चरित्र उज्वल करून जगासमोर ठेवले भगवद्गीता ही एक धर्मग्रंथ नसून तो एक जीवन ग्रंथ आहे आणि हे विचार तेजस्वी आहेत आणि या विचारावर चालण्यासाठी कोणाची परमिशन घेण्याची गरज नाही यामध्ये जगातल्या संपूर्ण मानव जातीसाठी हे विचार आहेत आणि विश्वाला सोबत घेऊन चालणारे विचार यामध्ये आहेत त्यासाठी सांगतो भारत पूर्वीपासूनच विश्वगुरू आहे आणि येणाऱ्या काळात लवकरच विश्वगुरू म्हणून प्रस्थापित होईल आणि भारत विश्व गुरु पुणे ही एक काळाची गरज आहे कारण आपल्या भारत देशामध्ये एकता समता बंधुता न्यायनीती ही असल्यामुळे आपल्यापासून जगातील कोणत्या च देशाला धोका नसून फायदाच आहे त्यासाठी भारत देश विश्वगुरू होने योग्यच आहे जय हिंद जय भारत

# शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विधानसभेत संकेत

## शेतकऱ्यांनी कर्ज भरू नयेत-कालिदास आपेट

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मालेगाव । संदीप कदम**

उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी शेतकऱ्यांच्या सरसकट कर्जमुक्तीच्या अंमलबजावणीसाठी माजी अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्याचे सुतोवाच नुकतेच विधानसभेत केले आहे. शेतकरी संघटनेच्या न्यायालयीन आणि रस्त्यावरील लढाईला अभूतपूर्व यश मिळाल्याने शेतकऱ्यांनी कुठलीही कर्जे भरू नयेत असे आवाहन शेतकरी संघटनेचे कार्याध्यक्ष तथा भारतीय किसान संघ-परिसंघ नवी दिल्लीचे सचिव कालिदास आपेट यांनी केले.

देवेंद्र फडणवीस सरकारने १८ जून २०१७ रोजी छत्रपती शिवाजी महाराज सन्मान योजना जाहीर केली. या योजनेनुसार शेतकऱ्यांचे १.५ लाख रुपये सरसकट कर्ज माफ करण्याचा निर्णय केला होता. दीड लाखाच्यावरील रकमेसाठी बँकेसोबत समझोता करून उर्वरित रक्कम भरल्यानंतर दीड लाख रुपये दिले जातील आणि नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपये प्रोत्साहन अनुदान देण्याचा निर्णय करण्यात आला.तरिही दीड लाख रुपयांच्या कर्जमाफी योजनेस पात्र असलेल्या ५.५६ लाख शेतकऱ्यांना वंचित ठेवून देवेंद्र फडणवीस सरकारने शेतकऱ्यांची फसवणूक केली होती. याविरोधात खिर्डी विविध कार्यकारी सहकारी (विकास)सेवा संस्था ता. श्रीरामपूर जि.अहमदनगर येथील सभासद कर्जदार बजरंग भाऊसाहेब पारखे आणि मयत कांतीबाई हळनोर यांचे वारस साहेबराव हळनोर यांनी छत्रपती शिवाजी महाराज सन्मान योजनेत आम्ही पात्र असतानाही देवेंद्र सरकारने पोर्टल बंद केल्याने १.५ लाख रुपये सरसकट कर्ज माफीचा लाभ मिळाला नाही. म्हणून औरंगाबाद उच्च न्यायालयात शेतकरी संघटनेचे उपाध्यक्ष ड.अजित काळे यांच्यामार्फत ९८०८/२२ क्रमांकाची याचिका दाखल केली.सुनावणी दरम्यान ड.अजित काळे यांनी केलेला युक्तिवाद न्यायालयाने ग्राह्य धरुन याचिका कर्त्यांना सरसकट १.५ लाख रुपये कर्जमाफी करण्याचा आदेश औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमूर्ती रविंद्र घुगे आणि अरुण पेडणेकर यांनी दिला. अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने आणि खिर्डी सेवा सहकारी (विकास) सेवा संस्थेने बजरंग भाऊसाहेब पारखे आणि मयत कांतीबाई हळनोर यांचे वारस साहेबराव हळनोर यांना न्यायालयीन आदेशानंतरही लाभ दिला नाही. ड.अजित काळे,ड.साक्षी काळे, ड.प्रतिक तलवार यांनी याविरोधात न्यायालयाच्या अवमानाची याचिका क्रमांक १५०/२३ श्रीमती विभा कंकनवाडी आणि एस.जी. चपळगांवकर यांच्या न्यायालयात दाखल केली.अवमान याचिकेची सुनावणी चालू असताना अशाच पद्धतीने महाराष्ट्रात लाखो शेतकऱ्यांना १.५ लाख रुपये सरसकट कर्जमाफीचा लाभ मिळाला नसल्याचे सांगितले.त्याच कारणासाठी शेतकऱ्यांना पुन्हा न्यायालयात यावे लागू नये. असा युक्तिवाद अँड अजित काळे यांनी न्यायालयासमोर केला. सरकारी वकील ड. कार्लेकर यांनी सहमती दर्शविली. न्यायालयाने सकारात्मक विचार करून ड. अजित काळे यांचे म्हणणे ग्राह्य धरले.दरम्यान उद्धव ठाकरे सरकारने दोन लाखापर्यंतची महात्मा ज्योतिबा फुले कर्जमुक्ती योजना राबविली. तरीही देवेंद्र सरकारने जाहीर केलेल्या दीड लाखाच्या योजनेतील ६.५६ लाख शेतकऱ्यांना पात्र असूनही लाभ मिळाला नव्हता. म्हणून शेतकरी संघटनेचे उपाध्यक्ष ड.अजित काळे यांनी औरंगाबाद खंडपीठात न्यायालयीन लढाई चालूच ठेवली. सन २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांना सरसकट कर्जमुक्तीचे पुन्हा आश्वासन दिले. शेतकऱ्यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावर विश्वास ठेवून मतदान केले.आता मुख्यमंत्री होऊन चार महिने उलटले तरीही शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीबाबत देवेंद्र फडणवीस बोलायला तयार नव्हते.१९ मार्च २०२५ रोजी शेतकरी संघटनेचे नेते रघुनाथदादा पाटील, उपाध्यक्ष ड.अजित काळे यांच्या नेतृत्वात शेतकऱ्यांच्या सरसकट कर्जमुक्तीसाठी शेतकरी संघटनेने पुणे येथील कृषी आयुक्तालयावर शेतकऱ्यांचा विराट मोर्चा काढला.या मोर्चाची दखल घेऊन उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची सरसकट कर्जमुक्ती करण्यासाठी माजी अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या नेतृत्वात समिती नेमण्याचा निर्णय केला आहे. मुनगंटीवार समितीने एका महिन्यात कर्जमुक्ती बाबत अहवाल द्यावा असेही अर्थमंत्री अजित पवार यांनी सांगितले आहे. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची लगेच कर्जमुक्ती होणार असल्याने शेतकऱ्यांनी कुठलीही कर्जे भरू नयेत.असे आवाहन शेतकरी संघटनेचे कार्याध्यक्ष कालिदास आपेट यांनी केले आहे.

# बिलोलीत आज दिव्यांग, वृध्द निराधारांचा आपल्या न्याय हक्कासाठी मेळाव्याचे आयोजन

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली । गौतम गावंडे**

शासन प्रशासन यांना जागे करण्यासाठी दिव्यांग वृध्द निराधार मित्र मंडळ महाराष्ट्र संस्थापक अध्यक्ष चंपतराव डाकोरे पाटिल कुंचोलीकर यांच्या अध्यक्षतेखाली मेळाव्याचे उद्घाटन मा.गजानन शिंदे तहसिलदार बिलोली, कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. श्रीनिवास पदमवार,मा. गटविकास अधिकारी बिलोली,सुधाकरराव पिल्लगुंडे, दिव्यांग वृध्द नि,मि.मं.मराठवाडा प्रमुख, प्रमुख वक्ते मा.गोंविदराव मुंडकर, जेष्ठ पत्रकार मां.माधवराव अटकोरे, अर्पण अवयवदान समिती नांदेड संस्थापक अध्यक्ष , प्रमुख उपस्थिती मां.अतुल भोसले पोलिस निरीक्षक बिलोली,मां.सतिषराव पुदाके मुख्यकार्यकारी न.पा.बिलोली,मां. नरसिंग निमलवाड आगार व्यवस्थापक बिलोरी,मां.कमलाकर जमदाडे, संपादक लोकसेवा न्यूज,मां.शहाजी वरखिंडे संपादक शिवगर्जना न्युज,मां.आरिफ शेख संपादक महाराष्ट्र २४ न्यूज, मां.मुस्ताफा पिंजारी पत्रकार संरक्षण ता.सचिव मुखेड, मां.रामप्रसाद चनावार जेष्ठ पत्रकार इत्यादी मान्यवरांच्या उपस्थितीत मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

दिव्यांग वृध्द निराधार बांधवांनो न्याय हक्क मिळावा म्हणून दिव्यांग वृध्द निराधार मित्र मंडळ महाराष्ट्र संस्थापक अध्यक्ष चंपतराव डाकोरे पाटिल कुंचोलीकर यांच्या नेतृत्वाखाली आपण शासन प्रशासन जागे करण्यासाठी अनेक निवेदन आंदोलन केल्यामुळे अनेक लाभ मिळत आहेत. अनेक प्रश्नांसाठी नांदेडचे माजी जिल्हाधिकारी अभिजित राऊत सरांनी संबंधित अधिकारी व गटविकास अधिकारी सर्व खातेप्रमुख व दिव्यांग संघटनेच्या पदाधिकारी सोबत सात वेळा बैठक,एक सुनावणी घेऊन कनिष्ठ अधिकारी जिल्हाधिकारी यांच्या आदेश,व निर्देशाची अंमलबजावणी केली जात नसल्यामुळे दिव्यांग वृध्द निराधार मित्र मंडळ महाराष्ट्र संस्थापक अध्यक्ष चंपतराव डाकोरे पाटिल कुंचोलीकर यांनी नुतन जिल्हाधिकारी नांदेड यांना निवेदनाद्वारे आंदोलनाचा इशारा देताच नुतन जिल्हाधिकारी



नांदेड यांनी दि.१८ मार्च २०२५ रोजी संबंधित अधिकारी जिल्हातील एकोनिस अधिकारी व दिव्यांचा संघटनेच्या पदाधिकारी सोबत बैठक मां.जिल्हाअधिकारी यांच्या नेतृत्वाखाली संपन्न झाली. पण अनेक कनिष्ठ अधिकारी यांना प्रत्यक्ष ऊपस्थित राहावे असे आदेश असताना अनेक अधिकारी उपस्थित नव्हते. तरी महोदय साहेबांनी दिव्यांगाच्या अनेक प्रश्नावर चर्चा करून संबंधित अधिकारी यांना फोनवर चर्चा करून आदेश दिले आहेत . आपण सनदशीर मार्गाने अनेक आंदोलने करुन वरीष्ठ अधिकारी बैठका,व सुनावणी घेऊन न्याय हक्क मिळत नसल्यामुळे पुढील दिशा रननिति संघटितपणे संघर्षासाठी दिव्यांग वृध्द, निराधार बांधवांनो मेळाव्यात ऊपस्थित राहावे असे आव्हान नांदेड जि.संपर्क प्रमुख नागोराव बंडे, जि.ऊपअध्यक्ष राजुभाऊ शेरकुरवार,जि.सचिव अनिल रामदिनवार,दिव्यांग वृध्द निराधार मित्र मंडळ महाराष्ट्र नांदेड जिल्ह्यातील पदाधिकारी बिलोली ता.अध्यक्ष बालाजी होनपारखे, नायगाव ता अध्यक्ष विठ्ठल बेलकर,मुखेड ता अध्यक्ष मगदुम शेख ऊंद्रीकर, ऊमरी ता.अध्यक्ष गजानन वंहिंदे, माहुर ता.अध्यक्ष उमेश भगत, हदगाव ता.अध्यक्ष नामदेव बोडके, अर्धापूर ता.अध्यक्ष दिंगाबर लोणे,लोहा ता.अध्यक्ष शेख हानिफ, कंधार ता.अध्यक्ष चांदु गवाले,देगलुर ता. अध्यक्ष रवि ठाकुर नांदेड ता.अध्यक्ष शेख मुस्तफा,किनवट ता.अध्यक्ष अंकुश राठोड महिला ता.अध्यक्ष बालीताई जंगनवाड,सविता नांदेड, नांदेड,तालुक्यातील सचिव शंकर म्हैत्रे,दत्तात्रय सोनकांबळे, रावसाहेब बसवदे,चांदराव चव्हाण,हानमंत हेळगिरे,बिलोली ता.ऊप अध्यक्ष गोपाळ अडबलवार ता.सचिव शंकर म्हैत्रे ता.सहसचिव संतोष नरवाडे कोषअध्यक्ष रामजी गायकवाड वृध्द ता.अध्यक्ष दिंगांबर तरटे,लालु वाघमारे, राजु श्रीरामे, पिराजी पंदिलवाड, इत्यादी पदाधिकारी बिलोली, असे प्रसिध्दी पत्रक दिव्यांग वृध्द निराधार मित्र मंडळ महाराष्ट्र ता. अध्यक्ष बालाजी होनपारखे सचिव शंकर म्हैत्रे यांनी दिले.

# नांदेड राष्ट्रवादी युवक जिल्हाध्यक्ष पदी बालाजी पाटील नागणिकर यांची निवड

लोकनेता न्यूज नेटवर्क

**सगरोळी । उत्तम घाटे**

बिलोली तालुक्यातील रहिवाशी असलेले मा. बालाजी पाटील शिंदे हे अगदी त्यांच्या लहान वयापासून ते आज पर्यन्त त्यांनी राजकारण ते समाज कारण तसेच गरीब जनतेच्या ऱ्हदयमध्ये त्यांनी आतापर्यंत बरेच आंदोलने सुद्धा केली जसे शेतकऱ्यांच्या शेतमालाला भाव मिळवा यासाठी त्यांनी खूप मोठ आंदोलन उभ करून शासनाला वेढीस धरले व त्या बरोरबर मराठा आरक्षणासाठी त्यांनी मोट्या प्रमानमध्ये पुढाकार घेऊन त्यांनी समाजाला व परिसरातील जनतेला न्याय मिळवून देण्याच महान कार्य त्यांनी करून दाखवला आहे तसेच नगणी या गावचे सरपंच म्हणून पण नगणी या गावचा विकासमध्ये त्यांचा मोठावाटा आहे . आगदी सर्वसाधारण कार्यकरट्यापासून



ते आमदार, खासदार ,मंत्री आशा सर्वांशी त्यांचे अगदी जीवल्याचे संबंध आहे त्यांनी प्रेरित केलेले आहेत दी २१/०३/२०२५ रोजी आपल्या जिल्ह्याचे लोकप्रिय नेते माजी खासदार मा प्रतापराव पाटील चिखळीकर व तसेच राष्ट्रवादी युवक प्रदेशाध्यक्ष सूरज दादा चव्हाण व बालाजी पाटील शिंदे यांचे मार्गदर्शक माधव भाऊ पवाडे यांनी बालाजी पाटील शिंदे यांची राष्ट्रवादी युवक जिल्हाध्यक्ष पदी नांदेड येते निवड करण्यात आली यावेळी माजी आमदार आविणश घाटे साहेब जिल्हाध्यक्ष दिलीपराव व धर्माधिकारी वसंत पाटील साहेब सुगावे बाळासाहेब पाटील रवंगवकर नेताजी दादा भोसले साहेबराव धनंगे साहेब पप्पू भाऊजाधव काणेया पाटील कदम मोशीन खान पठाण योगेश पाटील शिंदे स्वप्नील इंगळे अतुल हिंगमिरे विकास पाटील सूर्यवंशी गण्यानेश्वर पाटील नारवाडे आदि जन उपस्थित होते त्यांच्या ह्या निवडीबद्दल नांदेड जिल्हा व तसेच सर्व परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असल्याचा दिसून येत आहे.

# हिंगोली लोकसभा क्षेत्रातील हिंगोली तालुका राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी आढावा बैठक संपन्न

लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**

राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी ची आढावा बैठक दि २२ मार्च रोजी हिंगोली शहरातील कै. शिवाजीराव देशमुख सभागृहात आयोजित करण्यात आली होती.या बैठकीला प्रमुख उपस्थिती म्हणून राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे हिंगोली जिल्हाध्यक्ष बि.डी बांगर ,हिंगोली विधानसभेचे नेते प्रकाशराव थोरात नगरपरिषद/ नगरपंचायत कर्मचारी संघटना सेल चे राज्य प्रमुख, विश्र्वनाथ घुगे,हे उपस्थित होते.

या बैठकीत कार्यकर्त्यांना आगामी जिल्हा परिषद पंचायत समिती तसेच नगरपालिका निवडणुकी संदर्भात, तसेच सदस्य नोंदणी जिल्हाभरात कशी जास्तीत जास्त करता येईल व गाव तिथे शाखा घर तिथे राष्ट्रवादीचा कार्यकर्ता तयार करण्यासाठी सूचना दिल्या. तसेच







या बैठकीमध्ये हिंगोली तालुक्यातील सर्व पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आल्या या बैठकीला राष्ट्रवादी काँग्रेसच्या सर्व आघाडीचे राज्य पदाधिकारी व फ्रंटल सेलचे जिल्हाध्यक्ष पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यामध्ये हिंगोली तालुकाध्यक्ष रवी डोरले, शहराध्यक्ष केशव दुबे, राष्ट्रवादीचे युवक प्रदेश सचिव सुजय देशमुख, दुलेखॅ पठाण, युवक शहराध्यक्ष हिंगोली स्वप्निल इंगळे ,सुरज वडकुते, महेश थोरात, तेजस पवार, शेख हनीफ ,जुनेद पठाण, विशाल काळे, आजमत सयद् , सुभाष जावळे रमेश जावळे दिनकर लोणकर अतिक शेख, अफरोज शेख ,इमरान सय्यद, सुभाष झाडे, समाधान थोरात, बंडू गायवळ, दासराव थोरात, अमोल तारे ,सदाशिव थोरात, बालाजी टोम्पे ,सचिन मस्के ,व इतर सर्व पदाधिकारी उपस्थित होते.कार्यक्रमाचे आयोजन :-कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक हिंगोली व तालुका अध्यक्ष हिंगोली रवी डोरले यांनी केले रामदास पाटील सुमठाणकर प्रदेश कार्याध्यक्ष. दिव्यांग सेल, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, महाराष्ट्र राज्य.

# लोहा येथुन कोटगिरे कोंडावर याची महासभेवर वर्णी !

लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा । विशाल घंटे**

लोहा येथिल आर्य वैश्य नगरेश्वर मंदिर येथे समितिने विचार





विनिमय करुण महाराष्ट्र आर्य वैश्य महासभा जिल्हा कार्यकारीणी (ग्रामीण) नांदेड.साठी लोहा शहरातून दोन नावे सूर्यकांत व्यंकटराव कोटगीरे. नितीन वसंतराव कोंडावार यांचा नावाची सिफारस केली आहे अशी माहिती अध्यक्ष दिनेश तेललवार आर्य वैश्य नगरेश्वर मंदिर समिती लोहा यानी दिली आहे.

# जिद्द, चिकाटी, कौशल्य असणारा व्यक्ती नक्कीच गरुड झेप घेतो-अंजली धानोरकर

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र नाभिक महामंडळ बीड जिल्हाच्या वतीने नाभिक समाजातील महिलांचे सन्मान सोहळ्याचे आयोजन जन शिक्षण संस्थान या ठिकाणी करण्यात आले होते. यात नाभिक समाजातील विविध क्षेत्रातील यशस्वी महिलांचा सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्याला नाभिक समाजातील पुरुष व महिलांची लक्षनीय उपस्थिती लाभली.यात आदर्श शिक्षक,आदर्श माता,आदर्श राजकीय क्षेत्र,आदर्श सामाजिक क्षेत्र अशा विविध क्षेत्रातील महिलांचा सत्कार नाभिक सखी सन्मान पत्र देऊन संभाजीनगरच्या उपजिल्हाधिकारी सौ.अंजली धानोरकर यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी या कार्यक्रमाच्या मुख्य मार्गदर्शनामध्ये सौ.अंजली धानोरकर यांनी स्वयंरोजगार करण्याचा निश्चय केला पाहिजे व यासाठी जिद्द चिकाटी कौशल्य व संघर्षशील जीवन जगून एक फार मोठी गरुड झेप घेऊ शकतो असे अनेक उदाहरण या आपल्या मार्गदर्शनात केले गेले यामुळे या ठिकाणी असणाऱ्या पारंपरिक व्यवसायाविषयी आणि महिला लघुउद्योजक मध्ये भरारी घेण्याची नक्कीच प्रेरणा या मार्गदर्शन मुळे मिळाली. तसेच



हा सन्मान सोहळा सर्व समाजाला एक चांगला संदेश देणारा आहे. यावेळी महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळाचे ग्रामोद्योग अधिकारी श्री. डी. व्ही.फताटे, जनशिक्षण संस्थान चे संचालक देशमुख सर,महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे क्षेत्रीय व्यवस्थापक शिवशंकर साहेब, जिल्हा उद्योग मंडळ चे महाव्यवस्थापक किरण जाधव,दै. दिव्य लोकप्रभाचे उपासंपादक नितीन क्षीरसागर,आदर्श शिक्षक प्रताप काळे सर, सुरेश साळुंखे निवेदक,जिल्हाध्यक्ष विशाल वाघमारे,शाम राऊत,अक्षय जाधव,आकाश सपकाळ,शिवाजी सरडे, तुकाराम राऊत,सुमित दोडके, संदीप टाकळकर,अशोक वैद्य,सुरेश झेंडे,अक्षय वाघमारे,गणेश काशीद, अमोल राऊत, संदीपान वाघमारे,आदी जण उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ सीमा मनुरकर यांनी केले व आभार प्रदर्शन सुदाम पालकर यांनी केले.

# गांवात न जाणाऱ्या तलाठ्यावर कारवाई करा; अन्यथा साखळी उपोषण करणार !

## कंधार तहसील कार्यालया समोर साखळी उपोषण करण्याचा माजी सैनिक संघटणेचा इशारा!



लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

कंधार येथील अनेक कार्यालयातील अधिकारी कर्मचारी हे दौऱ्यांच्या नावाखाली कार्यालयाला दांडी मारत आहेत.शासकीय कर्मचाऱ्यांना कोणतेच वेळापत्रक राहिले,नसल्याने केव्हाही या आणि केव्हाही जा अशीच परिस्थिती निर्माण झाली आहे.दुपारी २ च्या नंतर अनेक कार्यालयांत शुकशुकाटच दिसत आहे. तलाठी गावांत जात नसल्याने सामान्य जनतेचे बेहाल होत आहेत.गावात न जाणाऱ्या तलाठ्यावर कारवाई करा,अन्यथा माजी सैनिक संघटणेच्या वतिने तहसील कार्यालया समोर साखळी उपोषण करण्याचा ईशारा बालाजी चुक्कलवाड यांनी दिला आहे. ग्रामीण भागातील गावांचा कारभार या जवळपास तलाठी व ग्रामसेवक यांच्यावर अवलंबून असतो. ग्रामसेवक हे सात ते आठ दिवसांने गावांत येत असतात परंतु तलाठी मात्र कधीच गावांत येऊन जनतेचे प्रश्न सोडताना दिसत नाहीत. कोणतेही काम असले तरी नागरिकांना कंधार शहरात येऊन तलाठ्यांना फोन लावून सही मागावी लागते.सामान्य जनतेचे प्रश्न सुटावे यासाठी शासन गावातले प्रश्न गावातले प्रश्न या उद्देशाने आपल्या दारी हा उपक्रम मोठ्या प्रमाणात राबविले जातात.

या संदर्भात कंधार तहसीलदार यांनी पत्र काढून सर्व तलाठ्यांना जनजागृती करण्याचे आदेश दिले होते.असे असतानाही या आदेशाला मात्र कंधार तालुक्यातील पूर्णच तलाठ्याने केराची टोपी दाखवली आहे. तहसीलदार यांनी आदेश काढले तेव्हापासून एकही तलाठी कोणत्याच गावांत जाऊन कसल्याच प्रकारची जनजागृती केली नाही.यासंदर्भात माजी सैनिक संघटना आक्रमक झाली असून तहसीलदारांच्या आदेशाचे पालन व गावात न जाणाऱ्या तलाठ्यावर कारवाई करा अशी मागणी माजी सैनिक संघटनेच्या वतीने निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. तलाठी यांची मनमानी त्वरित थांबवा अन्यथा माजी सैनिक संघटनेच्या वतीने तहसील कार्यालयासमोर दि.२ एप्रिल रोजी कार्यालयीन वेळात साखळी उपोषण करण्याचा इशारा माजी सैनिक संघटनेचे जिल्हा अध्यक्ष बालाजी चुक्कलवाड यांनी लेखी निवेदनाद्वारे दिले आहे.

**“ कंधार तालुक्यात मात्र उलट चित्र झाले,असून जनता तलाठ्याच्या दारी असे चित्र पाहण्यासाठी मिळत आहे. माजी सैनिक संघटनेच्या वतीने कोणत्याही जमिनी बॉन्डवर न लावत १९६६ महसूल अधिनियम ८५ /२ या कलमानुसार जमिनी सातबारावर लावण्यात याव्या अशी मागणी माजी सैनिक संघटनेच्या वतीने करण्यात आली होती,या मागणीची दखल घेऊन जिल्हा अधिकारी यांनी तहसीलदार यांना तात्काळ आदेश देऊन या मागणीची दखल घेतली होती,**

# पोलीस प्रशिक्षण केंद्र नानवीज-दौंड येथे सत्र क्र.४५ चा दिक्षांत संचलन समारंभ संपन्न!

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड । बबनराव धायतोंडे**

दि. २२ मार्च २०२५ रोजी सकाळी ०८.०० वा.पोलीस प्रशिक्षण केंद्र, नानवीज-दौंड येथे सत्र क्र. ४५ चा दिक्षांत संचलन समारंभ प्रमुख अतिथी मा.श्री.प्रविणकुमार पडवळ, (भा.पो.से) विशेष पोलीस महानिरीक्षक, प्रशिक्षण व खास पथके,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे उपस्थितीत पार पडला. दिक्षांत संचलनाचे नेतृत्व प्रशिक्षणार्थी शिवप्रसाद यांनी केले.यावेळी प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य श्री. नंदकुमार ठाकूर,भा.पो.से.यांनी सत्र क्रमांक ४५ तसेच प्रशिक्षण केंद्राचा वार्षीक अहवाल वाचन करुन येथील एकदंर कामकाजाची माहीती दिली.सदर संचलन समारंभास श्रीमती राजलक्ष्मी शिवणकर,समादेशक पोलीस बल गट क्र.७ दौंड, श्री. सोमनाथ वाघचौरे,समादेशक पोलीस बल गट क्र.५,डॉ.सोनोने डॉ. दाते तसेच दौंड परीसरातील शाळा व महाविद्यालयाचे प्राचार्य,विद्यार्थी हे विशेष करुन उपस्थित राहीले. प्रशिक्षणार्थी यांचे नातेवाईक,जेष्ठ नागरीक,सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी,पत्रकार बंधू व पोलीस प्रशिक्षण केंद्रातील सर्व अधिकारी, प्रशिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.प्रमुख अतिथी मा.श्री.पडवळ सर यांनी सर्व यशस्वी प्रशिक्षणार्थींचे अभिनंदन केले.प्रशिक्षणार्थींचे दिमाखदार संचलन,पोलीस प्रशिक्षण केंद्र नानवीज-दौंड येथे राबविलेले विविध उपक्रम,मॉडेल पोलीस स्टेशन,ट्राफिक पार्कचे आधुनिकीकरण व नव्याने शिकविण्यात आलेले भावनिक प्रज्ञावंत पोलीस,प्रशिक्षणार्थी यांचे श्रमदानातून बांधण्यात आलेली भव्य प्रेक्षक गॅलरी,विहीरीवरील जलशुध्दीकरण प्रकल्प इत्यादी उत्कृष्ट कामकाजाबाबत प्राचार्य तसेच त्यांचे सहकारी पोलीस अंमलदार यांचे कौतुक केले.तसेच वृक्षारोपण,रक्तदान,आरोग्य शिबीर,दत्तक गाव



योजना,स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत प्लास्टीकमुक्त परिसर,इत्यादी पर्यावरणपूरक विविध उपक्रम राबविण्यात आले. प्रशिक्षण केंद्रातील एकंदर कामकाजाबाबतही समाधान व्यक्त केले.पोलीस प्रशिक्षण केंद्र नानवीज येथे कृतीशील प्रयोगाच्या माध्यमातून तयार झालेला अष्टपैलू पोलीस कर्तव्यनिष्ठेने समाजाचे रक्षण करून महाराष्ट्र पोलीस दलाची शान नक्कीच उंचावेल व पोलीसांचे सद्रक्षणाय खलनिग्रहणाय या ब्रिदवाक्याला साजेसे वर्तन ठेवेल असा विश्वास व्यक्त केला.श्री.नंदकुमार ठाकूर,भा.पो.से प्राचार्य तथा पोलीस अधीक्षक यांचे मार्गदर्शन व नियोजनाखाली प्रशिक्षणार्थी यांनी या सत्रात विविध विभागात उत्तम कामगीरी करुन सन्मान मिळविला,त्यामध्ये आंतरवर्ग प्रथम व अष्टपैलू प्रशिक्षणार्थी म्हणून आकाश दत्तात्रय चव्हाण (भरती जिल्हा सांगली),बाहयवर्ग प्रथम महेश अशोक माने (भरती जिल्हा-अमरावती ग्रामीण), गोळीबार प्रथम क्रमांक,पांडुरंग गहिनीनाथ चव्हाण (भरती जिल्हा धाराशीव),उत्कृष्ठ खेळाडू ओंकार सनानंद कुंभार,(भरती जिल्हा- कोल्हापूर) यांना उत्कृष्ठ कामकाज केल्यामुळे सन्मान चिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. या दीक्षांत संचलनायाचे वेळी सत्र क्र. ४५ मधील स्मृतींना उजाळा देणारी सुदर्शन ही स्मरणीका प्रदर्शित करण्यात आली.प्रमुख अतिथी,निमंत्रित मान्यवर, पत्रकार बंधु छायाचित्रणकार, समालोचक व प्रशिक्षणार्थी यांचे नातेवाईक तसेच दिक्षांत संचलन यशस्वी करण्यासाठी ज्या ज्ञात अज्ञात व्यक्ती व संस्था यांनी मदत केली त्यांचे आभार याच प्रशिक्षण केंद्राचे उपप्राचार्य,श्री.रघुनाथ शिंदे, यांनी मानले.

## लोकशाही पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष व कार्याध्यक्षा यांचा अमृतास स्कूल ऑफ ब्युटी मेकअप आर्ट प्रा.लि.च्या वतीने सन्मान

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिड । प्रतिनिधी**

अमृतास स्कूल ऑफ ब्युटी ऑन मेकअप आर्ट प्रा.लि. ला लोकशाही पत्रकार संघांचे संस्थापक अध्यक्ष श्री भागवत वैद्य साहेब, महिला उद्योग विकास समितीच्या प्रदेश कार्याध्यक्षा सौ. संध्या सरोदे यांनी भेट देऊन पाहणी केली. बीड जिल्ह्यात प्रथम महिला व मुलींना मेकअप आर्टिस्ट, ब्युटी पार्लर मालक, नौकर होण्याची संधी उपलब्ध करून दिल्या बद्दल इंटरनॅशनल मेकअप आर्टिस्ट कु. अमृता अविनाश नाईकवाडे व प्रशिक्षक राहुल सर यांना खूप खूप



हार्दिक शुभेच्छा दिल्या. त्यांनी पण आमचा शिल्ड देऊन सन्मान केला. बीड जिल्ह्यातील महिलांनी ब्युटी पार्लर, मेकअप आर्टिट्स होऊन आपला व्यवसाय निर्माण करावा. मी पण इंटरनॅशनल मेकअप आर्टिस्ट आणि डाईट वेलनेस कोच आहे. लवकरच आपली एक शाखा परळी मध्ये चालू करण्याचा प्रयत्न करू. अशा भावना सौ. सरोदे यांनी व्यक्त केल्या.

## श्री शिवाजी विद्यालयाच्या मुख्याध्यापिकेला मारहाण

## लाथा बुक्यानी मारहाण करून कार्यालयातील साहित्याची केली तोडफोड

### निलंगा पोलीस ठाण्यात दोन महिलांच्या विरोधात तक्रार दाखल

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**निलंगा । इस्माईल महेबूब शेख**

निलंगा शहरातील श्री शिवाजी विद्यालयात क्लार्क पदावर आम्हास का घेतली नाहीस म्हणत दोन महिलानी मुख्याध्यापिकेस लाथा बुक्यानी मारहाण केल्याची घटना घडली आहे.कार्यालयातील साहित्याची तोडफोड ही करण्यात आली आहे.या बाबत पोलिस ठाण्यात संबंधित मुख्याध्यापिकेने तक्रार दिली आहे.

निलंगा शहरातील नामवंत विद्यालय श्री शिवाजी विद्यालयात आज सकाळी मुख्याध्यापिका दिपश्री तुकाराम जाधव कार्यालयीन कामकाज करत होते. त्यावेळी राधिका श्रीराम सोळुंके आणि सुवर्णा श्रीराम सोळुंके या कार्यालयात दाखल झाल्या.काही दिवसापूर्वी उपसंचालक कार्यालयात सुनावणीवेळी माझ्या विरोधात कागदपत्रे दाखल का केलीस असा जाब विचारत मारहाण करण्यात आली.आम्ही दिलेल्या प्रस्तावावर सही कर अन्यथा तुला ठार मारू म्हणत गळ्याला चाकू लावून लाथा बुक्याने मारहाण केली.जीवे मारण्याची धमकी दिली ही देण्यात आली. तसेच कार्यालयातील संगणक टेबल खुर्च्या मोबाईल आणि रजिस्टर फाडून टाकले ,कार्यालयाची तोडफोड केली आहे.

## रामलिंग मुदगड येथे जागतीक वनदिन साजरा




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कासार शिरशी । फिरोज जागीरदार**

रामलिंग मुदगड येतील जिल्हा परिषद शाळेत जागतीक वन दीना निमित्त मार्गदर्शन..वन संवर्धन ही केवळ पर्यावरण संरक्षणाचे बाब नाही तर ती मानव जातीच्या अस्तित्वाची गरज आहे पर्यावरण संवर्धनासाठी योगदान देणे आवश्यक आहे जलसंवर्धन व वन संवर्धन आणि जैव विविधता हवामान बदल आणि वनीकरणाच्या गरजेवर आपण सर्वांनी झाडे लावावे झाडे जगवावे व पर्यावरण संतुलना साठी सर्वांनी प्रयत्न केले पाहिजे विषयावर सखोल असे मार्गदर्शन येथील वनरक्षक मिटकरी मॅडम यांनी केले यावेळी राजकुमार आठीकर अनुराधा सुवर्णाकर बोरुळे सर आदी उपस्थित होते

## स्वामी रा.ती.विद्यापीठाने डॉ.नामदेव राठोड यांना लघू शोध प्रकल्प केला मंजूर!

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

संभाजीराव केंद्रे कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील ग्रंथालय विभाग प्रमुख तथा ग्रंथपाल सहयोगी प्रा.डॉ.नामदेव किशनराव राठोड यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने आंतरविद्या शाखेत भरीव संशोधन व्हावे यासाठी नुकताच लघु शोध प्रकल्प विद्यापीठाने मंजूर केला आहे.

लातूर जिल्ह्यातील सार्वजनिक ग्रंथालयीन वर्तमान स्थिती व भविष्यातील आव्हाने :एक अभ्यास या विषयावर ग्रंथपाल प्रा.डॉ.नामदेव राठोड यांच्या व्दारे सखोल संशोधन अभ्यास करून सदरील लघू शोध प्रकल्प २ वर्षात पुर्ण करून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठास सादर करण्यात येणार आहे,



स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड व्दारा लघू शोध (मायनर ) प्रकल्प मंजूर झाल्याबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मानवेंद्र केंद्रे,संस्थेचे अध्यक्ष डॉ. भागवत मानवेंद्र केंद्रे प्राचार्य डॉ.बी.टी.लहाने अधिक्षक अनिल केंद्रे, उपप्राचार्य डॉ.व्यंकटराव पाटील, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे प्रमुख डॉ.नरसिंग कुडकेकर,नॅक समन्वयक डॉ. माधव कांबळे, प्रो.डॉ.रामचंद्र पस्तापूर, संशोधन विभागाचे प्रमुख तथा अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ.संजय मुंडकर, डॉ. राजकूमार बिरादार, क्रिडा संचालक डॉ.तातेराव केंद्रे, डॉ. अशोक मुंडे, डॉ,बालाजी राठोड, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. प्रशांत कांबळे, विद्यार्थी कल्याण विभागाचे प्रभारी प्रा.डॉ. विजयकुमार कल्लूरकर,डॉ जितेंद्र शेळके,डॉ अल्का सौमवंशी,डॉ.अभिजित जोशी, प्रा डॉ मनिषा देशपांडे,प्रा संतोष दापकेकर,डॉ.विनोद नारायण, डॉ.कल्पना केंद्रे,डॉ.दगडू घटकार,डॉ.संदिपान मुंडे,डॉ दत्तात्र्य टिमकिकर,प्रा.अमोल मांदळे,प्रा अकाश मठवाले,प्रा अभिजित बचुटे,प्रा.संजय मोरे, प्रा बापुसाहेब वडजे,प्रा शरद सुरनर,प्रा अमोल मांदळे,प्रा सोनाबाई पाटील,प्रा. सौ आरती सुरपाम,श्याम तिडके,संजय बुजारे,ज्ञानोबा सिरसाठ आदीसह सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी प्रा.डॉ नामदेव राठोड यांचे अभिनंदन केले आहे,

## जयंती समिती अध्यक्षपदी सुशील सरकाळे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**चाकुर । रियाज मणियार**



विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव समितीच्या अध्यक्षपदी सुशील सरकाळे तर उपाध्यक्षपदी अविनाश कांबळे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.चापोलीतील प्रबोधन समाज मंदिर येथे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त बैठकीचे आयोजन केले होते. बैठकीत अध्यक्षपदी सुशील सरकाळे, उपाध्यक्षपदी अविनाश कांबळे सचिवपदी बाबुराव भालेराव, सहसचिवपदी रामेश्वर कांबळे, कोषाध्यक्षपदी हरीश कांबळे, तर मिरवणूक प्रमुखपदी आकाश कांबळे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली, यावेळी मोठ्या संख्येने समाज बांधव उपस्थित होते.


## मौ.आंबुलगा ता.कंधार येथील लिंबाचे झाड कोसळून घराचे व संसार उपयोगी सामानाचे प्रचंड नुकसान

### आंब्याचे, वादळी वारे व अवकाळी पाऊस झाल्यामुळे आंबुलगा आणि परिसरातील शेतकरी मदतीच्या प्रतिक्षेत

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आंबुलगा । सूर्यभान बिजलगावे**

कंधार तालुक्यातील आंबुलगा येथे दि.२०/०३/२०२५ रोजी ढगाळ वातावरण अचानक येऊन मोहन तुळशिराम वडजे यांच्या घरावर वादळी वारा, पाऊस येऊन सायंकाळी ठीक ६.३० वाजता लिंबाचे झाड घरावर कोसळून प्रचंड प्रमाणात घराचे व संसार उपयोगी सामानाचे प्रचंड नुकसान झाले असून घरामध्ये माणसे असताना कोणतीही जिवीत हानी झाली नाही. वादळी वाऱ्यामुळे झाडाचे आंबे गळून पडून नुकसान झाले आहे. शासनाकडून नुकसान झालेल्या घरमालकाला व शेतकऱ्याला मदत मिळण्याची मागणी होत आहे.शासन स्तरावर लवकरात लवकर मदत मिळणे गरजेचे आहे.



## थडी सावरगावचे लोकप्रिय युवा सरपंच योगेश्वर गायकवाड यांनी स्वत:केली गावातील नालीसफाई

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलूर । धनाजी जोशी**

देगलूर तालुक्यातील थडी सावरगाव नगरीचे लोकप्रिय युवा सरपंच योगेश्वर गायकवाड यांनी स्वतः केली नाली सफाई थडी त्यांनी गावात विकास कामाची पाहणी करताना गावातील प्रत्येक रस्त्याच्या बाजूला अनेक नाल्या तुंबल्याचे लक्षात येतात स्वतः युवा सरपंच असून देखील कुठलीच लाज न बाळगता स्वत नालीत उतरून नाली सफाई केली,या साफसफाई बद्दल गावाचं अनेक लोक चर्चा करत आहेत की सरपंच असावा तर,असा आजकाल अनेक सरपंच आपण पाहता ते स्वत इतर लोकांपासून कामे करून घेत असतात पण थडि सावरगावचे युवा सरपंच योगेश्वर गायकवाड यांनी साफसफाई करून आपल्या गावाबद्दल प्रेम व विकास करण्यासाठी तत्पर दाखवली आहे व आपल्या



गावातील समस्या, सोडवण्यासाठी व गावाच्या विकासासाठी तरुण वर्ग समोर आला पाहिजे तरच खऱ्या अर्थाने आपल्या गावाचा व आपल्या देशाचा विकास होऊ शकतो योगेश्वर गायकवाड यांचा आदर्श प्रत्येक तालुक्यातील इतर सरपंचांनी घेतला पाहिजे आणि विकासासाठी पुढे आले पाहिजे.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904